# उत्कृष्ट कामगिरी-

**सावंतवाडी पोलीस ठाणे गु.र.नं. 92/2019, भा.द.वि.कलम 395, 397,363,323,324,170,506, भारतीय हत्यार अधिनियम कलम 3 (1)/25 चा 1 (ब) मधील (ए)**

दि.13/05/2019 रोजी हातकणंगले, जि.कोल्हापुर येथील व्यापारी उमेश वसंतराव पिसे, हे गोवा येथुन हातकणंगले याठिकाणी आपले ईर्टिगा वाहनाने जात असताना 5 अज्ञात आरोपीत यांनी त्यांचा स्कॉर्पिओ गाडीने पाठलाग करुन उमेश वसंतराव पिसे यांची गाडी अडवुन त्यांचे अपहरण करून त्यांना दांडक्यांनी मारुन व पिस्टल दाखवुन त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम 1,90,000/- रुपये असा एकुण 5,56,000/- रुपयांचा दरोडा टाकुन उमेश पिसे यांना बेळगाव या ठिकाणी टाकुन पळुन गेलेले होते. सदरबाबत उमेश पिसे यांनी सावंतवाडी पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीत यांचे विरुदध तक्रार दिलेली होती. सदर घटनेने सिंधुदुर्ग जिल्हयातील व्यापारी तसेच सामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण झालेली होती.सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीत यांचा शोध घेण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. दिक्षीत गेडाम, अपर पोलीस अधीक्षक श्री.निमित गोयल तसेच कणकवली विभागाच्या सहा.पोलीस अधीक्षक श्रीमती भाग्यश्री नवटके यांचे नेतृत्वाखाली पोलीस तपास पथक निर्माण केलेले होते. सदर पोलीस तपास पथकाने अज्ञात आरोपीत यांचा सर्वतोपरी शोध घेतला, आपले गोपनीय बातमीदार सतर्क केले. आरोपीत यांनी गुन्हयाच्यावेळी वापरलेले स्कॉर्पिओ गाडीबाबत तपास केला. तसेच फिर्यादीयांचेकडे काम करणारे नोकर, ड्रायव्हर तसेच मित्र यांचेबाबत तपास केला होता. सदर तपासात फिर्यादी उमेश पिसे यांचेकडे पुर्वी ड्रायव्हर म्हणुन नोकरीस असणा-या इसमाचा सदर गुन्हयात सहभाग असल्याबाबत माहिती मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेऊन त्याचे इतर 5 साथीदार यांची नावे निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिलेली आहे. आरोपीत यांचे ताब्यातील स्कॉर्पिओ गाडी, 10,000/- रुपये रोख रक्कम, 10,000/- रु.रकमेची एअर पिस्टल, गुन्हयात वापरलेली बनावट नंबर प्लेट, इ.हस्तगत करण्यात आलेले आहे. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद पाटील हे करीत असुन आरोपीत यांना 7 दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मिळाली असुन अधिक तपास पोलीस करीत आहेत.

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग